


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

उद्याचा रंग आहे,
मोरपंखी हिरवा

वर्ष : ०६ | अंक : ६५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१८ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाराष्ट्रात १० जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट; कुठे वादळी पावसाची शक्यता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** महाराष्ट्रात ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच उष्ण आणि दमट हवामानाने घाम काढला आहे. आता हवामानात पुन्हा मोठा उलटफेर जाणवत आहेत. काही भागात उष्ण आणि दमट वातावरण कायम राहील, तर काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाच्या सरींचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाच्या वाऱ्यांसह गडगडाटासह पावसाची शक्यता आहे.

**रायगड जिल्ह्यात हलक्या सरींची शक्यता...**

पालघर, ठाणे आणि मुंबई येथे हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे. रायगड जिल्ह्यात हलक्या सरींची शक्यता असून, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. पुढील ३ दिवस हवामानाची अशीच स्थिती कायम राहील. धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आहे. या भागात पावसाचा विशेष अलर्ट नसला, तरी तापमानात वाढ झाल्यानं उष्णतेचा त्रास जाणवण्याची शक्यता आहे.



**हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज...**

अहिल्यानगर जिल्ह्यात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. पुणे घाटमाथ्यावर हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर कोल्हापूर, कोल्हापूर घाटमाथा, सातारा, सातारा घाटमाथा, सांगली आणि सोलापूर या भागात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. काही ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड आणि हिंगोली येथे हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे. नांदेड आणि लातूरमध्ये हलक्या सरींची शक्यता आहे, तर धाराशिव जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता**

विदर्भातील जिल्ह्यांसाठी सध्या पावसाचा विशेष अलर्ट नसून, बहुतांश ठिकाणी कोरडे, उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत काही भागांत हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. मात्र, राज्यातील अनेक भागांत अद्याप जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. विदर्भातील जिल्ह्यांसाठी सध्या पावसाचा विशेष अलर्ट नसून, बहुतांश ठिकाणी कोरडे, उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

## भयंकर ! कोलकाता शहरात दूर्गापूजेत मोठी चेंगराचेंगरी, १७ जणांचा मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, कोलकाता :** पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरात धक्कादायक घटना घडली आहे. दूर्गापूजेचा उत्सव साजरा करण्यासाठी जमा झालेल्या लोकांवर काळाने घाला घातलाय. दूर्गापूजेच्या उत्सवात शेकडो लोक सहभागी झाले होते. परंतु येथे अचानक चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीमुळे १७ जणांचा मृत्यू झालाय. तब्बल ४० पेक्षा जास्त लोक जमखी झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर संपूर्ण देश हादरला आहे.

**घटना नेमकी कशी घडली?**

आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार कोलकाता शहरात सप्तमीच्या संध्याकाळी ही दुर्दैवी घटना घडली. येथे दूर्गापूजेसाठी आलेल्या लोकांची अडचण होऊ नये म्हणून मोठा मंडप



टाकण्यात आला होता. या मंडपाचा काही भाग अचानक कोसळला. मंडप कोसळल्यानंतर लोकांनी मोठ्या प्रमाणात धावपळ केली. परिणामी पुढच्याच काही क्षणात मोठी चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत १७ जणांचा मृत्यू झाल्याचे आतापर्यंत समोर आले आहे. मृतांचा हा आकडा आणखी वाढू शकतो. ४० पेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत.

**मुख्यमंत्र्यांची रुग्णालयात धाव, बचावकार्य सुरू...**

ही घटना समोर येताच मदतकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आहेत. बचावकार्य केले जात आहे. जखमी भाविकांना रुग्णालयात दाखल केले जात आहे. दुसरीकडे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी रुग्णालयात धाव घेतली असून जखमींची विचारपूस केली आहे. मुख्यमंत्र्यांसोबत मुख्य सचिव मनोज अग्रवाल हेदेखील कोलकाता शहरातील वैद्यकीय महाविद्यालयात पोहोचले आहेत. दुसरीकडे ही घटना घडताच माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दु:ख व्यक्त केले. जखमी झालेल्या भाविकांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना त्यांनी केली. तसेच अशा कठीण काळात मी मृतांच्या कुटुंबीयांसोबत आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**अनेक लोक बेशुद्ध !**

या घटनेत जखमी झालेल्यांची मदत करण्यासाठी पश्चिम बंगालच्या सरकारने टोल फ्री नंबर जारी केला आहे. १८००३४५५६७८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे सरकारने आवाहन केले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार या घटनेत अनेक लोक बेशुद्ध झाले आहेत. काही लोकांना दुचाकीवर बसवून रुग्णालयात नेण्यात आले.

## गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याची आ.मुनगंटीवारांची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१७, चंद्रपूर :** शहरातील नागरिकांची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासह वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बल्लारपूर शहरात अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्यात यावी, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांना 'अ' नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बल्लारपूर शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल पडले आहे.

औद्योगिक आणि व्यापारीदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या बल्लारपूरमध्ये गंभीर गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे, संशयास्पद हालचालींवर प्रभावी नजर ठेवणे, आणि पोलिसांच्या तपासकार्यात आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेणे या उद्देशाने ही मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे.

शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, संवेदनशील ठिकाणे तसेच शहरात येण्या-जाण्याच्या प्रमुख मार्गांवर उच्चक्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या प्रस्तावित प्रणालीमध्ये आधुनिक नियंत्रण कक्ष, सीसीटीव्ही फुटेजच्या रेकॉर्डिंग व साठवणुकीची व्यवस्था, आवश्यक नेटवर्किंग आणि अखंडित वीजपुरवठ्यासाठीच्या सुविधांचा समावेश असणार आहे. या यंत्रणेमुळे शहरातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, गुन्हे घडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आणि गुन्ह्यांच्या तपासासाठी आवश्यक दृश्य पुरावे उपलब्ध करून घेणे पोलिसांना अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारानंतर चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक यांनी सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळून आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी आमदार मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला.

शहरातील प्रमुख ठिकाणांवर आधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यास गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच पोलिसांच्या तपासाला तांत्रिक आधार मिळू शकतो. तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना दृढ होण्यास मदत होईल. बल्लारपूर शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने या प्रस्तावाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## स्वत:च्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार, पित्याला जन्मठेप, बारामती न्यायालयाचा निकाल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, बारामती :** स्वतःच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी पित्याला बारामती येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश एस. आर. पाटील यांनी हा निकाल दिला. पीडितेला पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

ही घटना २०२२ मध्ये डली होती. आरोपी आपल्या मुलीसह आणि तिच्या सावत्र आईसोबत विटभट्टीवर राहण्यासाठी आला होता. तिथे २७ डिसेंबर २०२२ पासून त्याने मुलीवर सात ते आठ वेळा लैंगिक अत्याचार केले. या प्रकारातून मुलगी गर्भवती राहिली. याबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी आरोपीने तिला दिली होती.

मुलगी गर्भवती असल्याचे समजल्यानंतर आरोपी तिला विटभट्टीवर एकटीला सोडून निघून गेला. विटभट्टी मालकाच्या पत्नीने मुलीकडून तिच्या आजीचा आणि मामाचा संपर्क क्रमांक मिळवून त्यांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर मुलीला शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीत ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पीडितेने स्वतः दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक ए. बी. गटकूळ यांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरकारी वकिलांनी १२ साक्षीदार तपासले...**

सुनावणीदरम्यान सरकारी वकील स्नेहल कालीदास नाईक यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. त्यांनी १२ साक्षीदार तपासले. पीडितेची साक्ष आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेली साक्ष यांमधून आरोपांना पुष्टी मिळत असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. तो ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.

**कोर्टाने नेमके काय आदेश दिले?**

बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार आरोपीला सश्रम जन्मठेपेसह अन्य कलमांखाली दहा वर्षे आणि तीन वर्षांच्या सश्रम कारावासाच्या शिक्षाही सुनावण्यात आल्या. विविध कलमांखाली प्रत्येकी पाच हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. पीडितेला पाच लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. या खटल्यात पैरवी अधिकारी जी. के. कसपटे आणि दौंड पोलीस ठाण्यातील हवालदार मनीषा अहिवळे यांनी सरकारी पक्षाला सहकार्य केले.

**बाप-लेकीच्या नात्याला काळीमा...**

राज्यात महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार समोर येताना दिसतो. मुली बेपत्ता होण्याच्या घटनादेखील सातत्याने समोर येत आहेत. असं असताना मुली आपल्या घरातच सुरक्षित आहेत की नाही? असा प्रश्न उपस्थित व्हावा, अशी भयानक ही घटना आहे. खुद्द जन्मदात्या बापाकडूनच अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आल्याने अनेक जण ही घटना ऐकूण सुन्न झाले होते.

अशाप्रकारच्या घटनेमुळे बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासली गेली आहे. एक पिता आपल्या लेकीसोबत असा कसा वागू शकतो? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जातोय. आरोपी पित्याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात होती. न्यायालयाने अगदी तशीच शिक्षा सुनावली आहे. तसेच अशाप्रकारची घटना नेमकी घडूच कशी शकते? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

## साखरेच्या दरांवर नियंत्रणासाठी केंद्राचा मोठा डाव!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, दिल्ली :** वाढत्या साखरेच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशांतर्गत पुरवठा कायम राखण्यासाठी भारत सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. सरकारने तेल कंपन्यांना २०२६-२७ या पुरवठा वर्षात इथेनॉल उत्पादनासाठी साखरेचा वापर शून्यावर आणण्याचे निर्देश दिले आहेत. परिणामी उसाचा रस, साखर, साखरेचा पाक आणि बी-हेवी मोलॅसिस यांपासून उत्पादित इथेनॉलच्या खरेदीसाठीच्या नवीनतम निविदा मागवण्यात आलेल्या नाहीत.

जारी केलेल्या निविदेनुसार, तेल कंपन्या नोव्हेंबरमध्ये सुरू होणाऱ्या



पुरवठा वर्षासाठी अंदाजे ११ अब्ज लिटर इथेनॉल खरेदी करण्याची तयारी करत आहेत. मात्र, यावेळी कंपन्या मका, तुटलेला तांदूळ आणि भारतीय अन्न महामंडळाकडून खरेदी केलेल्या अतिरिक्त तांदळापासून बनवलेल्या इथेनॉलसाठी बोली लावू शकतात. भारत हा जगातील सर्वात मोठ्या साखर उपभोक्त्यांपैकी एक आहे. गेल्या काही काळापासून देशात साखरेचे भाव विक्रमी पातळीवर पोहोचण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकसारख्या प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये अपुऱ्या पावसामुळे साखर उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या संदर्भात, देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी ऊस आणि साखरेचा अधिक वाटा उपलब्ध व्हावा, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. म्हणूनच इथेनॉल उत्पादनात साखरेचा वापर मर्यादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या नवीन निविदेनुसार इथेनॉल उत्पादनासाठी मका, तुटलेला तांदूळ आणि अतिरिक्त तांदूळ वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. यामुळे साखरेवर आधारित कच्च्या मालाऐवजी धान्यांपासून इथेनॉल उत्पादनावर अधिक भर दिला जाऊ शकतो.




## खताची मात्रा गैरलागू

पहिली घटना – मागच्या आठवड्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात बनावट खतनिर्मितीचा कारखाना कृषी विभागाच्या छाप्यात उघडकीस आला. या छाप्यात २६ लाख रुपयांचा मुद्देमाल आणि ११८.७४ टन खतसाठा जप्त केला गेला. या गोदामात विविध कंपन्यांच्या वेगवेगळ्या ग्रेडच्या छापील रिकाम्या बॅगमध्ये निकृष्ट खत भरून पॅक करण्यात येत होते. या घोटाळ्याचे धागे इंदूरपर्यंत असल्याचे तपास यंत्रणांनी सांगितले आहे. मराठवाड्यात दोन वर्षांपूर्वी सोयाबीनची उगवण झाली नसल्याने निकृष्ट बियाण्यांचा मुद्दा ऐरणीवर आला होता. हे बियाणे मध्य प्रदेशातील कंपन्यांचे होते. आता निकृष्ट खत प्रकरणातही मध्य प्रदेश 'कनेक्शन' निघाल्यामुळे राज्याचा कृषी विभाग सावध झाला आहे.

दुसरी घटना – खत विक्री व्यवहावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'ई –पॉस' यंत्रणा कार्यान्वित आहे. 'फार्मर आयडी' आणि आधार कार्डचे लिंकिंग केल्यानंतरच संबंधितांना अनुदानित खत देण्याचा नियम आहे. सद्यस्थितीत 'ई –पॉस' मशिन नसलेल्या कृषी सेवा केंद्रांनाही खत पुरवठा होत असल्याने काळाबाजार तेजीत असल्याचे दिसते. छत्रपती संभाजीनगर कृषी विभागात ३१३ शेतकऱ्यांनी खताच्या वीसहून अधिक गोण्या (पोती) खरेदी केल्याची नोंद आहे. प्रत्यक्षात संबंधित शेतकऱ्यांनी खत खरेदी केली नसल्याचे कृषी विभागाच्या पाहणीत आढळले. शेतकऱ्यांचा फार्मर आयडी व आधार कार्डाचा अनधिकृत वापर केला गेल्याची शंका आहे.

या दोन घटनांवरून राज्यात खरीप हंगामाच्या तोंडावर सुरू असलेला खतविक्रीतील गैरप्रकार दिसून येतो. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे खतटंचाई होणार, अशी वार्ता ग्रामीण भागात वेगाने पसरली. खतखरेदीसाठी झुंबड उडाली. बाजारात भीती व संभ्रमावस्था वाढवून त्याचा गैरफायदा घेणारी यंत्रणा खतांचा काळाबाजार ते बनावट खतविक्रीतून आपले उखळ पांढरे करून घेत आहे. खत विक्रीत 'ई पॉस'चा गैरवापर असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. खत बाजारात दीड महिन्यांपासून नियमबाह्य विक्रीचा उच्छाद असताना कृषी विभागाच्या यंत्रणेला उशिराने जाग आली असेच म्हणावे लागेल.

कृषी विभागाने जिल्हानिहाय निविष्ठा संनियंत्रण समितीला खतविक्री व लिंकिंगबाबत सूचना दिल्या आहेत, तरीही खतविक्री गैरव्यवहाराच्या तक्रारी कायम आहेत. प्रत्यक्षात यंत्रणा पहिल्यापासून सक्रिय असती तर काळ्या बाजाराला लगाम घालणे शक्य होते. मात्र तसे झाले नाही. राज्यभरातून शेतकऱ्यांची ओरड वाढल्यानंतर आता कृषी विभागाने कारवाईचे संकेत देत, 'ई–पॉस' उपकरण नसताना खत पुरवठा केल्याचे आढळल्यास खत कंपनीवर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

गुणनियंत्रण निरीक्षक जिल्हाभरात कृषी सेवा केंद्रांची पडताळणी करताना शेतकऱ्यांना खतासाठी कोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, याची पाहणी करीत आहेत. यापूर्वीसुद्धा कृषी केंद्रांनी 'ई–पॉस' मशिनवर नियमानुसार खतांची विक्री न करणे, कृषी केंद्रांचा परवाना काढल्यानंतरही गोदामात खते व बियाण्यांची साठवणूक केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील ११८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, तर पाच केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले होते. धाराशिव जिल्ह्यातही एप्रिल महिन्यात मोठी कारवाई झाली. विक्री यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित असल्याचे विभागीय कृषी सहसंचालकांनी स्पष्ट केले.

जिल्ह्याचे कार्यक्षेत्र पाहता प्रत्येक ठिकाणी शासकीय यंत्रणा पोहचणे कठीण आहे. परिणामी, खतांचा तुटवडा आणि नियमबाह्य विक्री अशी दोलायमान परिस्थिती आहे. आतापर्यंत युरिया आणि डीएपी खतांची सर्वाधिक विक्री झाली आहे. ई–पॉस मशिनवर नोंद करूनच अनुदानित खतांची विक्री करणे बंधनकारक आहे. पण, अनुदानित खते खुल्या बाजारात चढ्या दराने विकण्याचे प्रकार घडत असल्याने जाब कुणाला विचारणार, असा प्रश्न आहे.

– मकरंद कुलकर्णी

# शालीनता संस्कृतीचा आत्मा हरवत चाललाय का?

काल सहज एक व्हिडिओ पाहिला आणि मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. नवरात्रीच्या गरब्याच्या नावाखाली सध्या जे काही प्रकार पाहायला मिळतात, ते पाहून मनात खरोखर खेद निर्माण होतो.

पाठीचा बहुतांश भाग उघडा ठेवणारे ब्लाऊज, केवळ नावापुरता घेतलेला चण्याचोळीचा दुपट्टा, शरीरप्रदर्शनाला प्राधान्य देणारी वस्त्ररचना आणि त्यातून निर्माण होणारे आकर्षण हे सगळं पाहताना एक प्रश्न मनात येतो की, आपण उत्सव साजरे करत आहोत की उत्सवांच्या मूळ उद्देशालाच हळूहळू विसरत चाललो आहोत?

यापूर्वी गरब्यामध्ये वाजणाऱ्या गाण्यांबाबत हा प्रश्न पडायचा. देवीची स्तुती करणारी, भक्तिभाव जागवणारी आणि पारंपरिक संस्कृतीची ओळख करून देणारी सुंदर गाणी बाजूला पडून बॉलीवूडच्या गाण्यांनी गरब्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु आता प्रश्न केवळ गाण्यांचा राहिलेला नाही. उत्सवाच्या नावाखाली होणारे शरीरप्रदर्शन, अश्लीलतेची वाढती प्रवृत्ती आणि फॅशनच्या नावाखाली सादर होणारे विचित्र प्रकार पाहता, आपण आपल्या परंपरांपासून नेमके किती दूर जात आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

आपण नऊ दिवस ज्या आदिशक्तीची विविध रूपांत आराधना करतो, तीच देवी चंड–मुंड, शुंभ–निशुंभ आणि महिषासुर यांसारख्या असुरांचा संहार करणारी शक्तिस्वरूपा आहे. तिच्या रौद्र रूपामध्ये अन्यायाचा नाश करण्याचे सामर्थ्य आहे, तर तिच्या पूजनीय मूर्तीमध्ये सात्त्विकता, सौंदर्य, शांतता आणि दिव्य तेज यांचे दर्शन घडते.

तिच्या वस्त्रांमधून, अलंकारांमधून आणि मुखावरील प्रसन्न भावांतून तिचे दिव्य सौंदर्य प्रकट होते. ती एकाच वेळी माया आहे, करुणा आहे, शक्ती आहे आणि अन्यायाविरुद्ध उभी ठाकणारी दुर्गाही आहे. तिच्या अनेक हातांतून अनेक जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या स्त्रीशक्तीचे दर्शन घडते.

मग ज्या देवीची आपण शालीनता, सात्त्विकता आणि शक्तीचे प्रतीक म्हणून पूजा करतो, त्या देवीच्या उत्सवाचे स्वरूप ठरवताना आपण तिच्या आराधनेमागील भावनेचा विचार करायला नको का?

शालीनता म्हणजे स्त्रीने नेमके काय परिधान करावे, याचे बंधन घालणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आवडीने कपडे निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु एखाद्या धार्मिक उत्सवाचे स्वरूप ठरवताना त्या उत्सवामागील श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक मूल्ये यांचाही विचार व्हायला हवा. फॅशन असावी, आनंद असावा, आधुनिकताही असावी; पण या सगळ्यांतून उत्सवाचा मूळ आत्माच हरवून जाऊ नये.

दहीहंडीच्या उत्सवाबाबतही असाच विचार मनात येतो.

लहानपणी दूरदर्शनवर दहीहंडी पाहताना मनात एक वेगळाच आनंद निर्माण व्हायचा. गोविंदांचे थर, त्यांचे कौशल्य, एकमेकांना दिलेली साथ, सामूहिक प्रयत्न आणि श्रीकृष्णाच्या बाललीलांची आठवण करून देणारा दहीकाला या सगळ्यांतून एक सुंदर सांस्कृतिक परंपरा अनुभवायला मिळायची.

आज मात्र काही ठिकाणी दहीहंडीच्या मंचावर मनोरंजनाच्या नावाखाली सादर होणारे अश्लील नृत्यप्रकार आणि अनावश्यक दिखावा पाहून प्रश्न पडतो की, आपण श्रीकृष्णाच्या त्या सुंदर बाललीलेचा नेमका कोणता अर्थ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवत आहोत?

दहीहंडी असो किंवा गरबा, हे उत्सव केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत. ते आपल्या संस्कृतीचे, सामूहिक आनंदाचे, भक्तीचे आणि परंपरेचे वाहक आहेत.

आपली हिंदू संस्कृती किती समृद्ध आहे! प्रत्येक सणामध्ये निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना आहे, ईश्वराविषयी श्रद्धा आहे, कुटुंबाला आणि समाजाला एकत्र आणण्याची शक्ती आहे. आपल्या परंपरांमध्ये सौंदर्य आहे, भक्ती आहे, कलात्मकता आहे आणि जीवन जगण्याचा एक सुंदर दृष्टिकोन आहे.

मात्र जेव्हा या परंपरांचा मूळ उद्देश मागे पडतो आणि त्यांची जागा केवळ प्रसिद्धी, दिखावा, शरीरप्रदर्शन किंवा बाजारूपण घेते, तेव्हा मनाला खरोखर वेदना होतात.

आणि अशा वेळी एक आई म्हणून माझ्या मनात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

जेव्हा मी माझ्या मुलीला गरबा दाखवण्यासाठी घेऊन जाते, तेव्हा तिला त्या उत्सवातील आनंद अनुभवायला मिळावा, तिने देवीची आराधना समजून घ्यावी, आपल्या परंपरांबद्दल तिच्या मनात अभिमान निर्माण व्हावा, अशी माझी इच्छा असते. तिला गरबा खेळायला आवडत असेल, तर तिने नक्की खेळावा. तिने आनंद घ्यावा, उत्सव साजरा करावा आणि आपल्या संस्कृतीशी जोडले जावे.

पण त्याच वेळी, तिथे तिला दिसणाऱ्या



प्रत्येक गोष्टीचा अर्थ तिला कसा समजावून सांगायचा, हा प्रश्नही माझ्यासमोर उभा राहतो.

फॅशन शोच्या नावाखाली सादर होणारी विचित्र, भयावह वेशभूषा, भुतांचे किंवा आत्म्यांचे स्वरूप धारण करून केले जाणारे प्रदर्शन आणि धार्मिक उत्सवाच्या मूळ भावनेशी विसंगत वाटणारे प्रकार पाहिल्यानंतर तिला आपल्या नवरात्रीचे खरे महत्त्व कसे समजावून सांगायचे?

कारण लहान मुले केवळ आपण त्यांना जे सांगतो त्यातूनच शिकत नाहीत; ती आपल्या आजूबाजूला जे पाहतात, त्याचेही सहज अनुकरण करतात. त्यांच्या मनात संस्कारांची पायाभरणी होत असताना आपण त्यांच्यासमोर नेमके कोणते आदर्श ठेवतो, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

माझा प्रश्न कोणाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला विरोध करण्याचा नाही. आधुनिकतेला विरोध करण्याचाही नाही. प्रश्न एवढाच आहे की, आपल्या सणांचे पावित्र्य, त्यामागील श्रद्धा आणि सांस्कृतिक ओळख जपण्याची जबाबदारी आपण विसरत तर नाही ना?

स्त्रीचे सौंदर्य केवळ तिच्या शरीरात नसते. तिच्या विचारांत, कर्तृत्वात, आत्मविश्वासात, संवेदनशीलतेत आणि स्वाभिमानातही तेवढेच सौंदर्य असते. शालीनता ही केवळ वस्त्रांमध्ये नसून ती व्यक्तीच्या वर्तनात, विचारांत आणि इतरांविषयीच्या आदरातही असते.

आपण देवीची पूजा करतो, स्त्रीशक्तीचा गौरव करतो, श्रीकृष्णाच्या लीला उत्साहाने साजऱ्या करतो. मग या उत्सवांतून पुढच्या पिढीपर्यंत भक्ती, एकोपा, सामर्थ्य, संस्कार आणि आपल्या परंपरांबद्दलचा अभिमान पोहोचवण्याचा प्रयत्न का करू नये?

आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणे म्हणजे बदलांना विरोध करणे नव्हे; तर बदल स्वीकारतानाही आपल्या परंपरांमधील चांगुलपणा जपणे होय.

उत्सव आधुनिक असावेत, आनंदी असावेत, भव्य असावेत; पण त्यांचा आत्मा हरवलेला नसावा.

कारण सणांचे खरे सौंदर्य त्यांच्या झगमगाटात नसते, तर त्यामागील श्रद्धेत असते. त्यांचे खरे वैभव शरीरप्रदर्शनात नसते, तर संस्कारांच्या जपणुकीत असते. आणि त्यांचा खरा आनंद केवळ संगीताच्या तालात नसतो, तर भक्ती, एकोपा आणि आपल्या संस्कृतीशी जोडल्या गेलेल्या भावनेत असतो.

शेवटी एकच प्रश्न स्वतःला विचारावासा वाटतो आपण आपल्या पुढच्या पिढीला केवळ उत्सव साजरे करायला शिकवत आहोत, की त्या उत्सवांमागील संस्कृती समजून घ्यायलाही शिकवत आहोत?

कारण परंपरा केवळ साजऱ्या करायच्या नसतात; त्या समजून घ्यायच्या, जपायच्या आणि पुढच्या पिढीपर्यंत योग्य अर्थाने पोहोचवायच्या असतात.

शालीनता ही बंधन नसून एक संस्कार आहे; आणि संस्कृती ही केवळ अभिमानाची गोष्ट नसून जपण्याची जबाबदारी आहे.

– ॲड. पूनम जाधव, ठाणे

## आठवी माळ

महादेवी महा गौरी
मूर्ती मनात साठवी
उत्साहे भारावे मन
माळ गुंफते आठवी

वर्ण नितळ गौरांगी
निर्मळअति भार्गवी
वृषा रुढा शोभिवंत
रूप अत्यंत लाघवी

गुलाबी रंग आवडे
स्नेह अंतरी जागवी
भक्त दयाळ माता
श्वेताम्बरधरा वैभवी

चतुर्भुजा शांत मुद्रा
दद्यान्शंभो शांभवी
अष्टवर्षा कुमारिका
शिव शंकरा लुभवी

कौशिकी रुप धारी
शुंभनिशुभ भागवी
चरा चरात निर्भया
नवीन उर्जा जागवी

उपवास अष्टमीचा
कु विचारा झिझवी
घागरी गं फुंकताना
सुख धारेत भिजवी

✍ - हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

## गणेशोत्सवातील चोरीच्या टोळीचा पर्दाफाश; २३ लाखांचा मुद्देमाल जप्त!

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१७, पुणे :** पुणे शहरातील गणेशोत्सव आणि गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान गर्दीचा फायदा घेऊन चोरी करणाऱ्या हरियाणातील टोळीचा विश्रामबाग पोलिसांनी गुजरात पोलिसांच्या मदतीने पर्दाफाश केला. या प्रकरणात तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून नऊ गुन्ह्यांतील १३ लाख रुपयांचा मुद्देमाल आणि गुन्ह्यांसाठी वापरलेली १० लाख रुपये किमतीची एर्टिगा कार, असा एकूण २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अजय कोळी (२०), अमन कोळी (२४) आणि दीपक सापसिंग (२१) अशी आरोपींची नावे आहेत. तपासात आरोपींचा विश्रामबाग



पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नऊ गुन्ह्यांशी संबंध उघडकीस आला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि तपास पथकाची कामगिरी

विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास भिंगारदिवे आणि रमेश लाहिगुडे यांच्या सूचनांनुसार तपास करण्यात आला.

तपास पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यवान गेंड, पोलीस उपनिरीक्षक मेहबूब मोकाशी, पोलीस अंमलदार सचिन कदम, नितीन मुंढे, महेश कदम, शैलेश सुर्वे, सचिन अहिवळे, शशिकांत दरेकर, साहिल शेख, कैलास डुकरे, जाकीर मणियार, अनिल शेख, शिवदत्त गायकवाड, फिरोज इनामदार, अर्जुन थोरात आणि नितीन बाबर यांनी केली.

विशेष म्हणजे, गेल्या दोन महिन्यांत या पथकाने विविध राज्यांत तपास करून ६२ गुन्हे उघडकीस आणत एकूण एक कोटी २३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पुढील तपास विश्रामबाग पोलीस करत आहे.

## बल्लारपूर पेपर मिलच्या मृत कामगाराच्या कुटुंबाला २० लाखांची मदत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** बल्लारपूर पेपर मिलमध्ये कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत असलेल्या सुधाकर चिमलवार (वय ४९, रा. कन्नमवार वार्ड, बल्लारपूर) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या कुटुंबाला २० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्यासह कुटुंबातील एका सदस्याला कंत्राटी कामगार म्हणून नोकरी देण्याबाबत व्यवस्थापन आणि बल्लारपूर पेपर मिल मजदूर सभेदरम्यान सहमती झाली. युनियनचे अध्यक्ष नरेश पुगलिया यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेण्यात आला.

१४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता सुधाकर चिमलवार हे नॅशनल इंजिनिअरिंग कॉन्ट्रॅक्टअंतर्गत कामावर असताना त्यांच्या छातीत दुखू लागले. त्यांना तातडीने बिल्ट रुग्णालयात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर चंद्रपूर येथील सीएचएल रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, तीव्र हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मजदूर सभेच्या पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष नरेश पुगलिया यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा सुरु झाली. १५ ऑक्टोबर रोजी झालेल्या चर्चेच्या अनेक फेऱ्यानंतर मृत कामगाराच्या कुटुंबाला २० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे ठरले. या रकमेत भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि उपदानाचा (ग्रॅच्युइटी) समावेश असेल. तसेच कुटुंबातील एका सदस्याला कंत्राटी कामगार म्हणून रोजगार देण्यावरही सहमती झाली. या चर्चेत कंपनीचे युनिट प्रमुख तथा उपाध्यक्ष उदय कुकडे आणि मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक प्रवीण शंकर यांनी व्यवस्थापनाच्या वतीने सहभाग घेतला. मृत सुधाकर चिमलवार यांच्या पश्चात दिव्यांग वडील, आई, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे निर्माण झालेल्या संकटात नुकसानभरपाई आणि रोजगाराच्या निर्णयामुळे कुटुंबाला आर्थिक आधार मिळणार आहे.

या प्रकरणात मजदूर सभेच्या वतीने तारासिंग कलसी, वसंत मांढरे, रामदास वाग्दरकर, कृष्णन नायर, वीरेंद्र आर्य, सुभाष माथनकर, सुदर्शन पुली, गजानन दिवसे, अनिल तुंगिडवार, आशिष मोहता, राजेंद्र शुक्ला आणि के. व्ही. रेड्डी यांनी प्रयत्न केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### ममता प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

**शाळा-पालक समन्वयातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर**





**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१७, पालम (परभणी) :** पालम येथील ममता प्राथमिक विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, सर्वांगीण विकास आणि शाळा-पालक यांच्यातील समन्वय या विषयांवर यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास बळीराजा शिक्षण संस्थेच्या ज्येष्ठ संचालिका चित्राताई गोळेगावकर, ममता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य कानगुले, मुख्याध्यापक संजय डोळेवार आणि पत्रकार बाळासाहेब फुलपगार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्याध्यापक डोळेवार यांनी प्रास्ताविकातून पालक मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पालकांनी शाळेशी सातत्याने समन्वय ठेवण्याचे आवाहन केले.

माजी प्राचार्य कानगुले सर यांनी शिक्षण, शिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे महत्त्व सांगितले. चित्राताई गोळेगावकर यांनी विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार करण्यासोबतच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

पत्रकार बाळासाहेब फुलपगार यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, शिस्त, संस्कार, आत्मविश्वास आणि मेहनतीचे महत्त्व पटवून देत जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक हनवते यांनी केले, तर चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक बेंबडे, चापके, दांडेगावकर, लिंगायत आणि भुसारे मॅडम यांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकीय तज्ज्ञांनी ५२ हजार तरूणांना दिले आरोग्याचे धडे

## ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ उपक्रमाला उत्सफूर्त प्रतिसाद




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, मुंबई :** बदलती जीवनशैली, मोबाईलचा वाढता वापर, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण यामुळे तरुणांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची गरज वाढली आहे. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळावे, यासाठी नवरात्रोत्सव काळात राज्यात ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद, जागर आरोग्याचा’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत राज्यात आतापर्यंत ३९३ सत्रे झाली असून, ५२ हजार ३८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

तरुण वयातच आरोग्याची काळजी घेण्याच्या योग्य सवयी लागाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांना आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्व समजावे, तसेच आरोग्यविषयक प्रश्नांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळावे, यासाठी ही सत्रे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमांतर्गत विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत आहेत. या सत्रांमध्ये वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांतील विद्यार्थी सहभागी होत आहेत.

**विभागनिहाय विद्यार्थ्यांचा सहभाग**

विभागनिहाय आकडेवारीनुसार, पश्चिम महाराष्ट्रात १२२ सत्रे झाली असून, त्यात ११ हजार ९८० विद्यार्थी सहभागी झाले. मराठवाड्यात ९१ सत्रांत ९ हजार ८५४, नाशिक विभागात ९३ सत्रांत १० हजार ६३४, तर अमरावती विभागात ६२ सत्रांत ६ हजार ३५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कोकण विभागात ५३ सत्रांत ६ हजार ४०४ विद्यार्थी सहभागी झाले. मुंबई विभागात २४ सत्रे होऊन ३ हजार २६९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नागपूर विभागात ४५ सत्रे झाली असून, त्यात ३ हजार ८९३ विद्यार्थी सहभागी झाले.

या सत्रांमध्ये संतुलित आहार, नियमित व्यायाम, मानसिक आरोग्य, मोबाइल व सोशल मीडियाचा वापर, व्यसनमुक्ती आणि निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. आरोग्याची काळजी कशी घ्यावी आणि दैनंदिन जीवनात कोणते बदल करावेत, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक होऊन ही माहिती कुटुंबीय आणि मित्रांपर्यंतही पोहोचवावी, हा या उपक्रमाचा हेतू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला ‘मुख्यमंत्री आरोग्य संवाद’ हा उपक्रम तरुणांना आरोग्याबाबत जागरूक करण्यासाठी महत्वाचा आहे. महाविद्यालयीन जीवनातच आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. तज्ज्ञांशी थेट संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक प्रश्न विचारता येतात आणि योग्य मार्गदर्शन मिळते.

या माध्यमातून आरोग्याबाबत जागरूक पिढी घडण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी व्यक्त केला.

## सिंगोरी येथील तुळजा भवानी मंदिरात नवरात्री उत्सव



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** पारशिवनी तालुक्यातील सिंगोरी गावात आई तुळजा भवानी मंदिराची स्थापना सुरेश येवले कुटुंबाने केली. गेल्या १० वर्षांपासून मंदिरात दोन्ही नवरात्री उत्सव मोठ्या थाटामाटात साजरे केले जात आहेत. याहीवर्षी मंदिर सुंदरपणे सजवण्यात आले आहे. अनिकेत येवले यांनी मंदिरात तुळजा भवानी देवीला फुलांनी सजवलेल्या दिसत आहेत.

मंदिराच्या आवारात रोषणाई आणि सर्व रंगांच्या पडद्यांनी सजावट करण्यात आली आहे. संपूर्ण गावातील महिला, पुरुष आणि मुलांकडून सकाळी आणि संध्याकाळी अर्धा तास संगीतमय आरती केली जात असून प्रसादाचे वाटपही केले जात आहे. तुमसर, रामटेक, नागपूर, पारशिवनी सावनेर या अनेक गावांमधून दर्शनासाठी मंदिरात भाविकांची गर्दी होत आहे. मंदिरात दररोज पुरुष आणि महिलांद्वारे भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात येत आहे. १८ ऑक्टोबर रोजी सामूहिक हवन आणि नव मुलींच्या पूजेनंतर महाप्रसादाचे वाटप केले जाईल.

# बिना (संगम) शिवारात बिबट्याची दहशत कायम; गोठ्यातील गोऱ्याची केली शिकार



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** परिसरातील बिना(संगम), भानेगाव, सावली, शिंगोरी, डोरली व गरांडा शिवारात मागील अनेक महिन्यांपासून बिबट्याचा मुक्तसंचार सुरू असून परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे. यादरम्यान बिना(संगम) येथील शेतकरी आनंद माणिकराव पाटील यांच्या गोठ्यात बांधलेल्या गायीच्या गोऱ्यावर बिबट्याने हल्ला चढवून शिकार केल्याची घटना १६ ऑक्टोबर शुक्रवारला सकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे.

त्यामुळे बिना(संगम) गावात संतापाची लाट उसळली असून वनविभागाची यंत्रणा पूर्णपणे कुचकामी ठरल्याचा आरोप गावकऱ्या कडून केला जातो आहे.आनंद पाटील यांच्या शेतात असलेल्या गोठ्यात जनावरे बांधलेली असताना मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने जनावरांवर हल्ला केला शुक्रवारला सकाळी गोरा मृताव्यवस्थेत दिसून आला.

मागील दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत बिबट्याने बिनासंगम गावातील अनेक पशुधनाची शिकार केली असून पशुधनाची सुरक्षा धोक्यात आली आहे.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभाग प्रशासनाने बिनासंगम परिसरात दोन पिंजरे लावले असून केवळ नावालाच उरले आहे. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी लावण्यात आलेले ट्रॅप कॅमेरेही प्रशासनाने काढून घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे त्यामुळे वनविभागाची संपूर्ण यंत्रणा बिबट्यासमोर कुचकामी ठरल्याचे चित्र आहे. घटनेची माहिती मिळताच कामठी वनपरिक्षेत्र विभागाचे क्षेत्र सहाय्यक विशाल आंबागडे यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला.

घटनेचा सविस्तर अहवाल सेमेनरी हिल्स येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना सादर करण्यात आला आहे. बिबट्याचा वाढता वावर बघता बिनासंगम, सावली, शिंगोरी, डोरली, गरांडा आदी भागात जीवितहानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. वनविभागाने तात्काळ या भागात लाईव्ह ट्रॅकिंग कॅमेरे लावावे व पिंजऱ्यांची संख्या वाढवून बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करावे अशी मागणी बिनासंगम परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या आदेशाने मौजा डोरली परिसरात १० लाईव्ह कॅमेरे व पिंजरे लावण्यात आले आहेत. बिनासंगम गाव राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदार संघात आहे मात्र कामठी वनपरिक्षेत्र विभागाकडे लाईव्ह कॅमेरे नसल्याची माहिती मिळाली असून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे बिबट्याला जेरबंद करने काळाची गरज आहे तेव्हा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वतः जातीने लक्ष घालून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्या अशी मागणी करण्यात येत आहे.

## पत्रकार मारहाण प्रकरणावर अखेर पडदा !

### मारहाण करणारे सत्ताधारी नगरसेवकांनी व्यक्त केली दिलगिरी



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१७, मिरा भाईंदर :** पत्रकार आणि सत्ताधारी पक्षातील नगरसेवक यांच्यात झालेल्या वादाला अखेर दिलगिरीच्या माध्यमातून काही प्रमाणात पूर्णविराम मिळाला. पत्रकारांशी झालेल्या गैरसमजातून हा प्रकार घडल्याचे सांगत सत्ताधारी नगरसेवक शानू गोहील आणि तरुण शर्मा यांनी पत्रकारांसमोर येऊन झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

या प्रकरणात पत्रकार आणि सत्ताधारी पक्षाकडून वाद मिटविण्यासाठी अनेक पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आले. सत्ताधारी पक्षाचे गटनेते हसमुख गेहलोत आणि उपमहापौर ध्रुवकिशोर पाटील यांनी पत्रकार व संबंधित नगरसेवकांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनीही मध्यस्थी करून वाद सामोपचाराने मिटविण्याचे प्रयत्न केले.

मात्र, पत्रकारांशी मारहाण करणाऱ्या नगरसेवकांनी प्रत्यक्ष पत्रकारांसमोर येऊन माफी मागावी, या मागणीवर पत्रकार ठाम राहिले. त्यामुळे काही काळ वाद कायम राहिला.

अखेर नगरसेवक शानू गोहील आणि तरुण शर्मा यांनी पत्रकारांसमोर येत, झालेला प्रकार हा गैरसमजातून घडल्याचे स्पष्ट केले. आम्ही पत्रकारांचा आदर करतो, असे सांगत त्यांनी झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर पत्रकारांनी सुरू केलेल्या धरणे आंदोलनाची महापौर डिम्पल मेहता यांच्या कक्षात सांगता करण्यात आली.

दरम्यान, पत्रकार जतीन दधीची आणि मयूर ठाकूर यांनी मात्र मारहाणीच्या घटनेबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे राजकीय पातळीवर समेट झाल्यानंतरही या प्रकरणाचा कायदेशीर प्रवास सुरू राहणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पत्रकारांवरील हल्ले अथवा गैरवर्तनाच्या घटनांबाबत पत्रकार संघटना आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातून सातत्याने तीव्र भूमिका घेतली जाते. त्यामुळे या प्रकरणातील पुढील घडामोडी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

## ९ हजार ९९९ कन्यांचे पूजन आणि भोजन, श्री माता महाकाली महोत्सवात स्त्रीशक्तीचा जागर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक परंपरांचा वारसा जपणार्या श्री माता महाकाली महोत्सवात दरवर्षीप्रमाणे यंदाही ९ हजार ९९९ कन्यांचे पूजन आणि भोजन कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आयोजित या महोत्सवात कन्यापूजनाच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचा सन्मान आणि भारतीय धार्मिक परंपरेचे जतन करण्यात आले.

यावेळी विविध समाजांच्या वतीने माता महाकालीची आरती करण्यात आली. नवरात्रीच्या काळात जन्मलेल्या ४२ बालिकांना श्री माता महाकाली महोत्सव समितीच्या वतीने चांदीची नाणी भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यासोबतच गुजराती समाजाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या दांडिया नृत्याने उत्सवात रंगत आणली, तर कबीर संस्कृती ग्रुपच्या वतीने सादर करण्यात आलेल्या जागरण गीतांनी भक्तिमय वातावरण अधिकच भारावून टाकले. नवरात्रोत्सवात कन्यापूजनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. कन्येमध्ये देवीचे स्वरूप पाहून तिचे पूजन करण्याची परंपरा भारतीय संस्कृतीत श्रद्धेने जपली जाते. याच श्रद्धेचे दर्शन श्री माता महाकाली महोत्सवात घडले. तब्बल ९ हजार ९९९ कन्यांचे पूजन करून त्यांना भोजन देण्यात आले. या उपक्रमातून कन्येप्रती आदर, श्रद्धा आणि सन्मानाची भावना व्यक्त करण्यात आली. कन्यापूजन आणि भोजनासाठी उपस्थित झालेल्या बालिकांमुळे महोत्सव परिसरात आनंदाचे आणि भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते. आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून श्री माता महाकाली महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरांचे जतन करण्यासोबतच समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. कन्यापूजन आणि भोजनाचा हा कार्यक्रम महोत्सवातील प्रमुख धार्मिक उपक्रमांपैकी एक आहे.धार्मिक परंपरेला सामाजिक जाणीवेची जोड देणारा हा उपक्रम महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरत आहे.

*** कबीर संस्कृती ग्रुपच्या जागरण गीतांनी भक्तिरसाची उधळण**

कबीर संस्कृती ग्रुपच्या वतीने सादर करण्यात आलेल्या जागरण गीतांनी महोत्सवातील भक्तिमय वातावरण अधिकच खुलविले. भक्तिपूर्ण गीतांच्या सादरीकरणातून माता महाकालीच्या चरणी श्रद्धा व्यक्त करण्यात आली. जागरण गीतांच्या माध्यमातून भाविकांना भक्तिरसाचा अनुभव मिळाला. पारंपरिक धार्मिक गीतांच्या सादरीकरणामुळे महोत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांना आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले.

## रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालयाचे कबड्डीत दुहेरी यश



**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१७, मुंबई :** रामनिरंजन झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर येथील पुरुष कबड्डी संघाने मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा २०२६-२७ मध्ये विजेतेपद पटकावले, तर महिला संघाने तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेचे आयोजन १४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाच्या वतीने चेतना'ज रामप्रसाद खंडेलवाल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, वांद्रे यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

पुरुष संघाने अंतिम सामन्यात रिझवी महाविद्यालयाचा १५ गुणांनी पराभव करून विजेतेपदावर नाव कोरले. महिला संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत जी.सराफ महाविद्यालयाचा २० गुणांनी पराभव करून तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल एचव्हीपीएसचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सिंह, संचालिका डॉ.उषा मुकुंदन आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हिमांशू दावडा यांनी दोन्ही संघांचे अभिनंदन केले.

पुरुष संघाला निलेश शिंदे,तर महिला संघाला अमित ताम्हाणेकर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका सीमा गद्रे आणि मरिसेल्वा यांच्या योगदानाचेही कौतुक करण्यात आले. दोन्ही संघांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर पडली असून, खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

